सायं.दैनिक आवाज जनसामान्यांचा..
बीड **किसान**
• संपादक : शेख कामरान •

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक १६ ▪ गुरुवार, दि. २२ मे, २०२५ ▪ पोस्टल दिनांक २३ मे, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-16 ▪ Thursday 22 May, 2025 ▪ Postal Date 23 May, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## खोटं बोलत असेल तर अटक करा : गोटे

धुळे (किसान न्युज): धुळ्याच्या गुलमोहर शासकीय विश्रामगृहात आमदारांना देण्यासाठी ५ कोटी रुपये आणल्याचा गंभीर आरोप ठाकरे गटाचे नेते अनिल गोटे यांनी केला.



त्यावरून राजकारण तापले आहे. यावर अर्जुन खोतकर यांनी सरकारला बदनाम करण्यासाठी हा प्लॅन असल्याचे म्हणत सर्व आरोप फेटाळले होते. आता यावर ठाकरे अनिल गोटे यांनी म्हटलंय की सरकार तुमचे आहे, मी खोटं बोलत असेल तर मला अटक करा. माजी आमदार अनिल गोटे म्हणाले की, अर्जुन खोतकर हे आपल्याला कधीपासून ओळखतात? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. दर सहा महिन्यांनी पक्ष बदलून बेडूक उड्या मारणाऱ्या व्यक्तीवर किती विश्वास ठेवायचा? असेही अनिल गोटे यांनी म्हटले आहे. » पान २ वर

# महावितरणात काम ना धामाचे सगळे टोनगेच जमा झालेत
# एक तर मेंटेनन्स होत नाही किमान तारेवर आलेले झाडे तरी तोडा
# एखादी तार तुटली तर दहा-दहा तास लोक अंधारात राहतात

### महावितरणचे अधिकारी तर एकदा सुद्धा शहरात कधी फीरतीवर दिसले नाही अन् खालचे कर्मचारी यांचं ऐकत सुद्धा नाही; मेंटेनन्सचा फुकटचा पैसा अधिकारी अन् गुत्तेदाराच्या घशात?

**बीड । किसान न्युज**

**पावसाळा अद्याप सुरू झालेला नसून अवकाळी पावसानेच महावितरण कंपनीचा कारभार उघडा पडला असून, शहरात वीज पुरवठ्याच्या खेळ खंडोबा झाला आहे. पावसाचे चार थेंब व थोडं ही वारं सुटलं तरी चार-चार तास शहरातील वीज गायब होत आहे. तर अनेक भागात विजेचा लपंडाव सुरू झाला असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. महावितरण कंपनी मान्सून पूर्व दुरीस्तीचे कामे करते की, नाही याचा काही मेळ लागत नसून निदान या कंपनीने विद्युत तारेवर आलेल्या झाडांच्या फांद्या छाटून घ्यावेत अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.**

महावितरण कंपनी म्हणजे गलथान कारभाराचा कळस असे चित्र शहरात असून, शहरातील अनेक भागात विद्युत तारा जुन्या झालेल्या असून, अनेक भागात तारांचा ताण कमी होऊन त्या लोंबकळत आहेत. या लोंबकळणाऱ्या तारा एकमेकांना चिकटून स्पार्किंग होऊन वीजपुरवठा खंडीत होत आहे. तसेच यामुळे वीजेची तूट वाढत आहे. यापूर्वी ला लोंबकळणाऱ्या तारांमुळे शहरातील एक टेम्पो जळून खाक झाल्याची तर तेली गल्ली भागात



### जितका वेळ वीजपुरवठा तेवढाच पगार द्यावा

सध्या महावितरण कंपनी ग्राहकांसाठी प्रीपेड मीटर आणण्याची चर्चा सुरू असून, काही ठिकाणी हे मीटर बसविण्यात आल्याचे वृत्त आहे. या माध्यमातून जेवढं रिचार्ज तेवढीच वीज वापरता येणार आहे. मग याच धर्तीवर शासन आणि महावितरण कंपनीने जेवढे तास सुरळीत वीजपुरवठा तेवढाच पगार असा निर्णय घ्यावा यामुळे निदान विजेचा लपंडाव थांबून नागरिकांना दिलासा मिळेल अशी चर्चा सुरू आहे.

एका तरुणाच्या डोक्याला तारेचा स्पर्श होऊन त्यास करंट लागून गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. अशा घटना घडल्या तरी महावितरण कंपनी अद्याप झोपेत दिसत असून, सर्व विभाग » पान २ वर

# वेल्डन एसपी कॉवत साहेब; एकाच वेळी ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

### बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक घटना; पारदर्शक बदल्यांचा आदर्श नमुना



### अनेक कर्मचाऱ्यांची गोची, गॉडफादर ही आला नाही कामी

**बीड । किसान न्युज**

शासकीय कर्मचारी अन् पुढारी ही सांगड झाली असून, त्यातली त्या पोलीस म्हटलं की, आणखी जास्त कामाचा माणूस यामुळे पुढारी प्रतिष्ठा लावून त्यास आपल्याच ठाण्यात ठेवतो यामुळे अनेकजण बऱ्याच वर्षांपासून एकाच ठिकाणी चिकटून बसत 'फेव्हिकॉल का जोड तुटेगा नहीं' म्हणत बिनधास्त होते. पण पोलीस अधीक्षक यांनी कोणाचेच न ऐकता नियमाप्रमाणे आणि कसलाही घोडेबाजार न होऊ देता पोलीस दलातील ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. एकाचवेळी इतक्या बदल्या होणे ही जिल्ह्यातील ऐतिहासिक घटना असल्याची तसेच कोणाच्या गॉडफादरचा फायदा झाला नाही. या पारदर्शक बदल्या प्रकाराने अनेकांना धक्का बसला असून सुजान नागरिकांमधून मात्र याबाबत पोलीस अधीक्षक यांचे कौतुक करीत वेल्डन एसपी साहेब अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. कोणतीही वशिलेबाजी, घोडेबाजाराला थारा न देता. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी नियमाप्रमाणे आणि गॉडफादरच्या आशीर्वादाने खुर्चीला चिकटून बसलेल्या पोलीस कर्मचारी अधिकारी यांच्या बदल्या केल्या आहेत. आज एकूण ६०६ बदली झालेल्या कर्मचाऱ्यांची यादी बाहेर आली आहे. या प्रकरणी पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी स्वतःलक्ष घालून कालावधीपूर्ण झालेले आणि निकषात बसणाऱ्या कर्मचारी आणि सहाय्यक फौजदारांना बदलीपासून संरक्षण मिळणार नसल्याचे आधीच जाहीर केले होते. अनेक पोलीस » पान २ वर

# बीड गोळीबार प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर

### ॲड.अविनाश गंडलेंचा प्रभावी व अभ्यासपूर्ण युक्तिवादाने मकोका मधून देखील सुटका

**बीड । किसान न्युज**

बीड शहरातील बार्शी नाका,प्रकाश आंबेडकर नगर मध्ये दिनांक १३/१२/२०२४ रोजी रात्री दोन वाजण्याच्या सुमारास अभिषेक विश्वास डोंगरे यांच्या घरी जावून गोळीबार केल्या प्रकरणी अक्षय आठवले, मनिष क्षीरसागर, आशिष आठवले, प्रसाद धिवार विरोधात गन्हा दाखल झाला होता.वरील आरोपीच्या हातात पिस्टल होते व प्रसाद धिवार हा घर दाखवत होता, अशा प्रकारची फिर्याद फिर्यादीने पेठ बीड पोलीस स्टेशन येथे दिली होती. त्यामध्ये दिनांक १९/०६/२०२४ रोजी प्रसाद धिवार सोबत झालेल्या भांडणाचे कारण काढुन दिनांक १३/१२/२०२४ रोजी घरावर गोळीबार केला अशा प्रकारची फिर्याद दिली होती. सदरील आरोपींवर मोक्का लावण्यात आला होता. यामधील आरोपी प्रसाद धिवार यांचा मोक्का कमी करण्यात आला. आरोपी प्रसाद धिवार याचेवर कलम



१०९, १९१ (२), १९१ (३), १९०, ६१ (२), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३३३ बी.एन.एस. नुसार व कलम ३, २५, २७ शस्त्र अधिनियम कायद्या अंतर्गत तसेच कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम नुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता. आरोपी तर्फे प्रसिध्द विधिज्ञ ॲड. अविनाश पं.गंडले यांच्या मार्फत जामीन दाखल करण्यात आला होता. आरोपीचे वतीने ॲड. अविनाश पं. गंडले यांनी केलेला प्रभावी व अभ्यासपुर्ण युक्तीवाद ग्राह्य धरुन » पान २ वर

# राजेंद्र हगवणे याची राष्ट्रवादीतून हकालपट्टी

### चुकीचे वागणाऱ्यांना टायरमध्ये घालून मारलं जाईल : अजित पवार

**पुणे । किसान न्युज**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने कठोर निर्णय घेत माजी तालुकाध्यक्ष राजेंद्र हगवणे याची पक्षातून हकालपट्टी केली आहे. युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी ही माहिती दिली असून, हगवणे यांचा आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी काहीही संबंध राहिलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाने संपूर्ण राज्याला हादरवून





सोडले आहे. सासरच्या जाचाला कंटाळून वैष्णवीने टोकाचा निर्णय घेतल्यानंतर, तिच्या पतीसह सासू आणि नणंदला अटक करण्यात आली आहे. तर सासरे राजेंद्र हगवणे आणि दीर अद्याप फरार असून, पोलिसांच्या चार पथकांकडून त्यांचा शोध सुरू आहे. सूरज चव्हाण यांनी सांगितले की, अजित पवारांनी स्वतः पुण्याचे पोलीस आयुक्त यांच्याशी संपर्क साधून दोषींवर तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. अजितदादांनी यापूर्वी अनेकदा स्पष्ट केलं आहे की, कुणी चुकीचे वागले, तर टायरमध्ये घालून मारण्यात येईल, अशी तीव्र कारवाई केली जाईल, असेही चव्हाण म्हणाले. वैष्णवीच्या आत्महत्येनंतर राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून संताप व्यक्त केला जात असून, आरोपींवर कडक कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. यामुळेच राष्ट्रवादीने तातडीने पावले उचलत राजेंद्र हगवणे यांची हकालपट्टी केल्याचे स्पष्ट केले आहे.

# शहरातील नागरी समस्या तातडीने सोडवा

### डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली रा.कॉं.च्या शिष्टमंडळाचे सीओंना निवेदन

**बीड । किसान न्युज**

दि.२२ : शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे गुरुवारी (दि.२२) केली. पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात माजी नगरसेवकांचा समावेश होता. विविध विभागांतील समस्यांवर ठोस कृती



आराखडा राबवावा, असेही निवेदनात म्हटले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता, नालेसफाई, पथदिवे, रस्त्यांची दुरवस्था, पाणी पुरवठ्याची विस्कळीत व्यवस्था, अपूर्ण गाळे व बाजारपेठांची कामे, तसेच आरोग्य सुविधा आणि कर वसुलीतील अडचणी आदी मुद्द्यांवर शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. सध्या शहरातील अनेक मुख्य नाले कचऱ्यामुळे तुंबले असून, त्यामुळे डास, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. हे नाले तातडीने यंत्राच्या सहाय्याने साफ करण्यात यावेत. तसेच, नव्या घंटागाड्या, जेसीबी व कम्पॅक्टर खरेदी करून स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, » पान २ वर

# अवकाळी पावसामुळे भिंत कोसळू चिमुरडी ठार

**कन्नड । किसान न्युज**

तालुक्यात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या सातत्यपूर्ण अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, अनेकांच्या घरांची पडझड होऊन संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहेत. बुधवारी मध्यरात्री १२ ते गुरुवारी पहाटे ३ वाजेपर्यंत कन्नड शहरासह तालुक्यात जोरदार



अवकाळी पावसाने थैमान घातले. यामध्ये एका घराची भिंत कोसळून १२ वर्षीय चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू झाला असून सात जण जखमी झाले आहेत. मृत मुलीचे नाव आयशा अशपाक शेख (वय १२, रा. छम्मन का बंगला, कन्नड) असे आहे. ही दुर्घटना मोहन रामप्रसाद भारुका आणि ओम रामप्रसाद भारुका यांच्या जुन्या घराची भिंत शेजारील अशफाक शेख यांच्या घरावर कोसळल्याने घडली. या दुर्घटनेत पेंटर काम करणारे अशपाक रज्जाक शेख, सादिया » पान २ वर

# असले नालायक लोक माझ्या पक्षात नको : अजित पवार

**मुंबई । किसान न्युज**

माझा सभासद असेल तर त्याची हकालपट्टी करतो. असली लोकं माझ्या पक्षात नकोत, अशी संतप्त प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणी राजेंद्र हगवणे यांच्याविषयी बोलताना अजित पवारांनी भाष्य केले आहे. असले नालायक लोक मला माझ्या पक्षात नकोत, असेही अजित पवारांनी म्हटले आहे. अजित पवार म्हणाले, माझा सभासद असेल तर त्याची हकालपट्टी करतो. असली लोकं माझ्या पक्षात नकोत. बहुतेक त्यांचे लव्ह मॅरेज आहे. माझा तिथे काही संबंध नाही. मी फक्त लग्नाला गेलो. जे फरार आहेत त्यांचा शोध सुरू आहे. त्यांचा शोध घेण्यासाठी पथक नेमली आहेत. माणुसकी म्हणून जबाबदारी म्हणून जे काही करायचे



आहे ते आम्ही केले आहे. असले नालायक लोक मला माझ्या पक्षात नकोत. पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, माझा दुरान्वये संबंध नाही, फक्त लग्नाला गेलो म्हणून माझी बदनामी केली गेली. या प्रकरणातील आरोपींना अटक केली आहे. दोघे फरार आहेत. शोधासाठी आणखी पथके वाढवायला सांगितली आहेत. तसेच जर अजित पवार दोषी असतील तर अजित पवारला » पान २ वर

# धनादेश न वटल्याने आरोपीस एक वर्षाची शिक्षा व दंड!

**बीड । किसान न्युज**

बीड येथील मे. गजानन बेकरी प्रो. प्रा. चंद्रकांत सुंदरराव थोटे यांनी मराठवाडा अर्बन को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड यांच्याकडून कर्ज घेतले होते व सदर कर्जाचे च्या हफ्त्या पोटी मे गजानन बेकरी प्रोप्रायटर चंद्रकांतराव सुंदरराव यांनी थोटे वरील संस्थे धनादेश दिला होता परंतु खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे सदर धनादेश न वाटता परत आला त्यामुळे वरील संस्थेने आरोपी गजानन बेकरी प्रोप्रायटर पत्रकांत खोटे यांच्याविरुद्ध कलम १३८ एन आय प्रमाणे प्रकरण दाखल केले होते सदर प्रकरणात मराठवाडा अर्बन को-ऑपरेटिव्हेट क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड च्या वतीने प्राधिकृत अधिकारी जालिंदर उत्तम गवळी तसेच यांनी दिलेली साक्ष व दाखल केलेली कागदपत्रे याचा विचार करून पाचवे प्रथम वर्ग दंडअधिकारी बीड यांनी कर्जदार आरोपी चंद्रकांत सुंदराव » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 97,300
२२ कॅरेट 95,000
चांदी प्रतिकिलो 99,000